


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक ३१ । गुरुवार २२ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## विखे पाटील - थोरातांची सहमती एक्सप्रेस सुसाट!

### जिल्हा बँकेत ११ जागा बिनविरोध; जामखेडमध्ये विखेशिंदे एकत्र!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सहमती आणि समन्वयाचे सकारात्मक चित्र समोर आले आहे. बँकेच्या एकूण २१ जागांपैकी तब्बल ११ जागांवर उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याने जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्याशी संबंधित राजकीय प्रवाहांमधील समन्वयाचे चित्र, तसेच जामखेडमध्ये विखे पाटील आणि सभापती प्रा. राम शिंदे यांच्या गटांमध्ये जुळलेली समीकरणे, या निवडणुकीची वैशिष्ट्ये ठरत आहेत. सहकार क्षेत्राच्या हितासाठी स्थानिक पातळीवर समन्वय साधत बिनविरोध निवडीचा मार्ग खुला झाल्याने जिल्हा बँकेच्या निवडणुकीला सकारात्मक दिशा मिळाली आहे.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्वाची संस्था आहे. शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करून देणे, सहकारी संस्थांना आर्थिक पाठबळ देणे आणि ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांना गती देणे, यामध्ये बँकेची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे बँकेच्या संचालक मंडळाची निवड ही केवळ राजकीयदृष्ट्या नव्हे, तर जिल्ह्यातील सहकार चळवळीच्या भविष्यासाठीही महत्त्वाची मानली जाते.




यंदाच्या निवडणुकीत २१ पैकी ११ जागा बिनविरोध झाल्याने स्थानिक पातळीवरील समन्वयाला महत्त्व प्राप्त झाले आहे. विविध तालुक्यांतील नेतृत्वाने उमेदवारांच्या निवडीबाबत सहमती साधल्यामुळे अनेक ठिकाणी निवडणुकीतील स्पर्धा टाळता आली. सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या अनुभवी नेतृत्वाला प्रतिनिधित्व मिळण्याबरोबरच संस्थेच्या कामकाजाला स्थैर्य मिळण्याच्या दृष्टीनेही या बिनविरोध निवडी महत्त्वाच्या ठरतात.

विखे-पाटीलथोरात यांच्या समन्वयाला महत्त्व अहिल्यानगरच्या राजकारणात मंत्री विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे दोन महत्त्वाचे राजकीय नेते आहेत. त्यांच्या राजकीय भूमिका वेगवेगळ्या असल्या, तरी सहकारी संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्थानिक परिस्थिती, मतदारसंघातील समीकरणे आणि संस्थेच्या हिताचे मुद्दे यांनुसार समन्वयाची शक्यता निर्माण होत असते. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत झालेल्या बिनविरोध निवडींमुळे अशा समन्वयाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. सहकार क्षेत्रातील प्रतिनिधित्व निश्चित करताना स्थानिक नेतृत्व, संस्थात्मक अनुभव आणि परस्पर सहमती यांना महत्त्व मिळाल्याचे या निवडणुकीतून दिसून येते. त्यामुळे विखे-पाटील आणि थोरात यांच्याशी संबंधित राजकीय समीकरणांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत जामखेडमधील बिनविरोध निवडही लक्षवेधी ठरली आहे. जामखेडमधून सचिन घुमरे यांची बिनविरोध निवड झाल्याने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि सभापती प्रा. राम शिंदे यांच्या गटांमधील स्थानिक समन्वयाला महत्त्व प्राप्त झाले आहे. जामखेडच्या राजकारणात दोन्ही नेत्यांचे स्वतंत्र प्रभावक्षेत्र आहे. अशा परिस्थितीत जिल्हा बँकेच्या निवडणुकीत बिनविरोध निवड घडून येणे ही स्थानिक पातळीवरील जुळवाजुळव आणि सहमतीची महत्त्वपूर्ण बाब मानली जात आहे. सहकार संस्थांमधील प्रतिनिधित्व निश्चित करताना परस्पर समन्वयातून मार्ग काढता येतो, हे या घडामोडीतून अधोरेखित झाले आहे. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांमध्ये विविध तालुक्यांतील महत्त्वाच्या नेत्यांचा समावेश आहे. या निवडींमुळे जिल्ह्यातील विविध तालुक्यांना जिल्हा बँकेच्या संचालक मंडळावर प्रतिनिधित्व मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. स्थानिक सहकारी संस्थांमधील अनुभव, मतदारसंघातील नेतृत्व आणि ■ पान ४ वर

## उच्च न्यायालयात एकनाथ घोगरे यांची याचिका फेटाळली

### डॉ. सुजय विखे पाटील यांचा जिल्हा बँकेतील मार्ग मोकळा!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उमेदवारीला आव्हान देणारी एकनाथ घोगरे यांची याचिका छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे डॉ. विखे पाटील यांच्या उमेदवारीवरील न्यायालयीन आव्हान दूर झाले असून, राहाता सेवा संस्था मतदारसंघातून जिल्हा बँकेच्या संचालकपदी त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहाता सेवा संस्था मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या उमेदवारीवर विरोधी उमेदवार एकनाथ घोगरे यांनी हरकत घेतली होती. मात्र, निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांनी ही हरकत फेटाळून लावली. या निर्णयाविरोधात घोगरे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या याचिकेवर न्यायमूर्ती मंजुषा अजय देशपांडे यांच्यासमोर अंतिम सुनावणी झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने घोगरे यांची याचिका फेटाळली. त्यामुळे डॉ. विखे पाटील यांच्या उमेदवारीला न्यायालयात दिलेले आव्हान निष्प्रभ ठरले.

या प्रकरणात डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वतीने ॲड. विनायक होन आणि ॲड. अभय ओस्तवाल यांनी बाजू मांडली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने ॲड. सुभाष तांबे, तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या वतीने ॲड. साहेबराव कदम यांनी काम पाहिले. उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील या प्रकरणाला पूर्णविराम मिळाला आहे. राहाता सेवा संस्था मतदारसंघातून डॉ. सुजय विखे पाटील यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याने जिल्हा बँकेच्या राजकीय समीकरणांच्या दृष्टीनेही या घडामोडीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

## शेवगाव व कोपरगावात वाळू तस्करांवर कारवाई

### एलसीबीकडून साडेबावीस लाखांचा मुद्देमाल जप्त, चारजणांवर गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने शेवगाव आणि कोपरगाव येथे अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करत दोन वेगवेगळ्या छाप्यांमध्ये तब्बल २२ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत दोन जणांना अटक करण्यात आली असून दोन आरोपी फरार झाले आहेत.

एसपींच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी दोन विशेष पथके तयार केली. या पथकांमध्ये भगवान सानप, मनोज साखरे, बाळासाहेब खेडकर, महादेव भांड, अरुण गांगुर्डे, अभिजीत अरकल, नीलकंठ कारखेले आणि रणजीत जाधव या



अंमलदारांचा समावेश होता. या पथकांनी २१ आणि २२ ऑक्टोबर रोजी शेवगाव व कोपरगाव येथे छापे टाकले. शेवगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत टाकलेल्या छाप्यात ७ लाख ३५ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी वैजिनाथ रमेश काळे (वय ३१, रा. मुंगी, ता. शेवगाव) याला अटक करण्यात आली असून त्याचा साथीदार विठ्ठल सर्जे राव गव्हाणे हा फरार आहे.

कोपरगाव शहर हद्दीत केलेल्या कारवाईत तब्बल १५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात अनिल रामदास गायकवाड (वय ३९, रा. मुर्शीदपूर) याला ताब्यात घेण्यात आले असून सोनू उर्फ सागर पाले हा फरार झाला आहे. दोन्ही प्रकरणांत भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) आणि ३(५) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## शेवग्यात गांजाचे आंतरपीक!

### एलसीबीकडून नेवाशात दोघांना अटक, अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील वाटापूर येथे शेवग्याच्या बागेत लपवून केलेली गांजाची शेती उघडकीस आली असून, स्थानिक गुन्हे शाखा आणि सोनई पोलिसांनी यावर संयुक्त छापा टाकत दोघांना गजाआड केले आहे. या कारवाईत ५.१० किलो वजनाची २ लाख ५५ हजार रुपये किमतीची गांजाची झाडे जप्त करण्यात आली आहेत.

वाटापूर गावात रखमाजी कुशाबा आयनर याने वाट्याने कसण्यासाठी घेतलेल्या जमिनीत शेवग्याच्या पिकात गांजाची लागवड केल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. यानंतर पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे तपास पथक आणि सपोनि अनिल मोरे यांच्या नेतृत्वाखालील सोनई पोलिसांच्या पथकाने पंचांसमक्ष संबंधित शेतात पाहणी



केली. या तपासणीत शेवग्याच्या झाडांमध्ये लपवून लावलेली गांजाची लहान-मोठी झाडे पोलिसांना आढळून आली. ■ पान ४ वर

## भूखंडाचे श्रीखंड!

### पैठणमध्ये गट क्रमांक १८४ मधील खेळाच्या मैदानासाठी आरक्षित भूखंडावर प्लॉटिंग करून विक्री केल्याचा आरोप । प्रभाग क्रमांक १० मधील नगरपरिषदेच्या सुधारित आराखड्यातील आरक्षणाचा मुद्दा चर्चेत; चौकशीची मागणी होण्याची शक्यता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील गट क्रमांक १८४ मध्ये खेळाच्या मैदानासाठी (प्ले ग्राउंड) राखीव असलेल्या भूखंडावर प्लॉटिंग करून विक्री केली जात असल्याचा आरोप समोर आला आहे. नगरपरिषदेच्या सुधारित आराखड्यात सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असलेल्या या जागेवर खासगी प्लॉटिंग होत असल्याच्या आरोपामुळे शहरात खळबळ उडाली आहे. शहरातील मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध व्हावे, या उद्देशाने राखीव ठेवण्यात आलेल्या जागेचा वापर अन्य कारणासाठी होत असल्यास हा गंभीर विषय ठरू शकतो. संबंधित भूखंडाचे आरक्षण, प्लॉटिंगसाठी घेतलेली परवानगी, जमीन व्यवहारांची कागदपत्रे आणि नगरपरिषदेच्या मंजूर आराखड्याची पडताळणी करणे आवश्यक आहे.




आरक्षित जागेवर प्लॉटिंगला परवानगी कोणी दिली?* गट क्रमांक १८४ मधील भूखंडाचे आरक्षण कायम आहे का? तसेच, भूखंड विक्रीचे व्यवहार झाले असल्यास त्यांना कोणत्या नियमांच्या आधारे मान्यता देण्यात आली? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रकरणाची नगरपरिषद प्रशासनाने आणि संबंधित महसूल यंत्रणेने सखोल चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी. नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

खेळाच्या मैदानासाठी राखीव जागेवरच प्लॉटिंगचा आरोप होत असल्याने, आता नगरपरिषद प्रशासन याबाबत काय भूमिका घेते, याकडे पैठणकरांचे लक्ष लागले आहे.

## प्रेमसंबंधातून तरुणाचा खून, दोघांना अटक

### एलसीबी आणि एमआयडीसी पोलिसांकडून गुन्ह्याचा उलगडा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रेमसंबंधातून एका तरुणाचा खून करून त्याचा मृतदेह पुरावा नष्ट करण्यासाठी कॅनॉलमध्ये फेकून दिल्याच्या गुन्ह्याचा एमआयडीसी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने उलगडा केला असून दोन आरोपींना जेरबंद केले आहे. दिनांक १७ ऑक्टोबर रोजी रात्री ही घटना घडली होती. गणेश मच्छिंद्र गायकवाड (वय ३२, रा. कमालपूर, ता. श्रीरामपूर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्याचा भाऊ प्रदीप गायकवाड याने दिलेल्या फिर्यादीवरून ■ पान ४ वर




### कुक्कडवेढा येथे आढळला मृतदेह

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी महेशच्या पत्नीचे मयत गणेश याच्याशी लग्नापूर्वीपासून प्रेमसंबंध होते. गणेश तिला भेटण्यासाठी शिंगवेनाईक येथे घरी आला असता त्याला दोघांनी पकडून मारहाण केली आणि खून करून मृतदेह कॅनॉलमध्ये फेकून दिल्याचे आरोपींनी सांगितले. या माहितीनंतर पोलिसांनी शोधमोहीम राबवून कुक्कडवेढा (ता. राहुरी) येथे कॅनॉलमध्ये गणेशचा मृतदेह शोधून काढला.

### या तपास पथकाने लावला गुन्ह्याचा छडा

ही कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, नगर ग्रामीण विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि हेमंत थोरात, पोसई अजय कौटे, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ शैलेश रोहोकले, राजू सुद्रीक, फोलाणे, सुशांत दिवटे, पोकॉ दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, सुरज देशमुख, अक्षय रोहोकले, मपोकॉ थोरात तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि हरीश भोये, पोहेकॉ अरुण गांगुर्डे, राहुल द्वारके, पोकॉ सतीश भवर, सागर ससाणे, अरुण सांगळे, आणि दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू यांनी केली.

## दै. आकर्षण निवडक

### हिंदू धर्मातील अतिशय महत्व असलेल्या शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमेचे बसने आयोजन

अहिल्यानगर- हिंदू धर्मातील अतिशय महत्व असलेल्या शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमेचे दि.२९ डिसेंबर २०२६ ते १२ जानेवारी २०२७ दरम्यान आयोजन करण्यात आले. हि संपुर्ण परिक्रमा संपूर्ण बसने होणार असल्याची माहिती नंदकुमार पोळ यांनी दिली. नर्मदा-परिक्रमेचे आद्य प्रवर्तक श्रीमार्कण्डेय मुनी ! त्यांनी सुमारे सात हजार वर्षापूर्वी नर्मदेची परिक्रमा केली. त्या परिक्रमेचं वैशिष्ट्य असं की त्यांनी नर्मदेचीच नव्हे तर तिच्या उभय तटांवर तिला येऊन मिळणाऱ्या ९९९ नद्यांच्या धारा-प्रवाह न ओलांडता प्रत्येकीच्या उगमाला वळसा घालून मार्गक्रमण केलं.नर्मदा परिक्रमेचे हिंदू धर्मात खूप मोठे आध्यात्मिक महत्व आहे, या नदीच्या किनारी असलेल्या तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन मानवाला पुण्य मिळते अशी श्रद्धा आहे. श्री नर्मदा परिक्रमा नर्मदेच्या काठाकाठाने केलेली प्रदक्षिणा म्हणजेच श्री नर्मदा परिक्रमा. ही एक धार्मिक यात्रा आहे. यात्रा धार्मिक अंगाने केली जात असली तरी वाटेत भेटणारा निसर्ग,मैय्याच खळाळत आपल्या सोबतच वाहणारं पाणी,असंख्य मंदिरे,आखीव-रेखिव बांधलेले घाट, साधेभोळे पण मैय्यावर निस्सिम श्रध्दा असलेले तिकडचे रहिवासी हे सगळेच परिक्रमावसियांना अंतर्मुख तर करतेच पण बरंच काही शिकवून जाते. ही परिक्रमा म्हणजे मानसिक, शारीरिक व आध्यात्मिक तप आहे. परिक्रमा पायी केली काय आणि वाहनाने केली काय मैय्यासाठी सगळे परिक्रमावासी सारखेच आणि तिची लेकरेच. म्हणुनच या आईच प्रेम अनुभवायच असेल तर आपण एकदा तरी नर्मदा परिक्रमा केलीच पाहिजे.यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे मुक्कामाची सोय ही डबल शेअरिंग एसी रूम मध्ये असेल.अधिक माहितीसाठी अभिजीत पोळ मो. नं.९४२२२२७९०६, नंदकुमार पोळ मो. नं. ७८७५५०००५६ यांच्याशी संपर्क साधावा.

### निमगाव वाघात भारतरत्न डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

अहिल्यानगर - भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले



जाणारे भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती निमगाव वाघा (ता. नगर) येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.
निमगाव वाघा ग्रामपंचायत, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपस्थितांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचे स्मरण केले. या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, ग्रामपंचायत अधिकारी प्रवीण पानसंबळ, रामा पवार, सोमनाथ आतकर, रितेश डोंगरे, संदीप डोंगरे, शशिकांत होळकर आदी उपस्थित होते.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या ज्ञानाच्या, कर्तृत्वाच्या आणि जिद्दीच्या बळावर देशाच्या विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. अत्यंत सामान्य परिस्थितीतून पुढे येत त्यांनी देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत मजल मारली. आपल्या साध्या राहणीमानाने, प्रामाणिक विचारांनी आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या विशेष जिव्हाळ्याने त्यांनी देशवासीयांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले. त्यांच्या जीवनप्रवासातून आजही तरुणांना आणि विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची, ती पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करण्याची प्रेरणा मिळते.डॉ. कलाम यांनी आपले संपूर्ण जीवन देशाच्या प्रगतीसाठी समर्पित केले. भारताला विज्ञान आणि संरक्षण क्षेत्रात सक्षम बनविण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. राष्ट्रपतीपदावर कार्यरत असतानाही त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याला आणि तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याला प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांची जयंती केवळ अभिवादनाचा दिवस नसून, त्यांच्या विचारांचा स्वीकार करून देशाच्या विकासासाठी योगदान देण्याचा संकल्प करावा. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा प्रसार करणे, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि युवकांना राष्ट्रउभारणीच्या कार्यासाठी प्रेरित करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना पै. नाना डोंगरे यांनी व्यक्त केली.

# दिवाळीत अभियानाच्या पणत्या खरेदी करा; सरकारी शाळा वाचविण्याच्या चळवळीला हातभार लावा!

**'ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा, सरकारी शाळा वाचवा' अभियानांतर्गत सुदाम लगड यांचे नागरिकांना आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर : दिवाळीच्या सणासाठी पणत्या खरेदी करताना 'ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा, सरकारी शाळा वाचवा' या अभियानांतर्गत उपलब्ध असलेल्या पणत्यांची खरेदी करून सरकारी शाळा वाचविण्याच्या सामाजिक चळवळीला हातभार लावावा, असे आवाहन 'सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद' (अभियान), महाराष्ट्र राज्याचे मुख्य संयोजक सुदाम विलास लगड यांनी केले आहे.

दिवाळीत प्रत्येक घरात पणत्या लावून आनंदोत्सव साजरा केला जातो. यंदा या आनंदाला सामाजिक कार्याची जोड देण्याची संधी नागरिकांना उपलब्ध झाली आहे. दिवाळीसाठी आपल्या घराकरिता, नातेवाईकांसाठी, मित्रपरिवारासाठी आणि शेजाऱ्यांना भेट देण्यासाठी पणत्या खरेदी करताना या अभियानाच्या पणत्या खरेदी कराव्यात. आपल्या पणत्या खरेदीतून सरकारी शाळा वाचविण्याच्या अभियानाला बळ मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

सरकारी शाळा या सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणाची संधी देणारी ज्ञानमंदिरे आहेत. या शाळांचे संवर्धन व्हावे, त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावावा आणि प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देण्याची गरज आहे. याच उद्देशाने 'ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा, सरकारी शाळा वाचवा' हे अभियान राबविण्यात येत आहे.

**– दिवाळीच्या पणत्या खरेदीतून सामाजिक योगदान द्या!**

नागरिकांनी दिवाळीसाठी पणत्या खरेदी करताना या अभियानाच्या पणत्यांना प्राधान्य द्यावे. केवळ स्वतःच्या घरासाठीच नव्हे, तर नातेवाईक, मित्र आणि परिचितांना भेट देण्यासाठीही या पणत्यांची खरेदी करावी. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना व कुटुंबीयांना या उपक्रमाची माहिती देऊन अभियानाच्या पणत्या खरेदी करण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच, आपल्या परिसरातील नागरिकांनाही या उपक्रमात सहभागी करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दिवाळीतील पणत्यांचा प्रकाश घर उजळवतो, तर शिक्षणाचा प्रकाश विद्यार्थ्यांचे भविष्य घडवतो. त्यामुळे यंदाच्या दिवाळीत पणत्या खरेदी करताना सामाजिक बांधिलकी जपत सरकारी शाळा वाचविण्याच्या अभियानाच्या पणत्या खरेदी करून या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा.

'एक पणती आपल्या घरासाठी, एक संकल्प सरकारी शाळांसाठी!' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवून अभियानाच्या पणत्यांची अधिकाधिक खरेदी व्हावी, असे आवाहन मुख्य संयोजक सुदाम विलास लगड यांनी केले आहे. पणत्यासाठी सुदाम विलास लगड ८८०५६४३३३३ / ८८५७०८९५५७ यांच्याशी संपर्क साधावा.



वैष्णव मित्र मंडळाच्यावतीने आयोजित रावण दहन कार्यक्रमावेळी आमदार संग्राम जगताप आणि प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान किशोर गांधी यांचा सत्कार करण्यात आला.

# पैठण-छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर ओव्हरलोड वाळू वाहतूक बिनदिक्कत!

**वाळू घाटांचा लिलाव नसतानाही हायवांची वर्दळ; पोलीस, महसूल आणि आरटीओच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यात एकाही वाळू घाटाचा लिलाव झालेला नसल्याचे सांगितले जात असताना पैठण-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून ओव्हरलोड हायवांद्वारे वाळूची वाहतूक सुरू असल्याचा आरोप होत आहे. या प्रकाराकडे पोलीस, महसूल प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागाचे (आरटीओ) दुर्लक्ष होत असल्याचा सवाल उपस्थित केला जात असून, या वाहतुकीमागील नेमके गौडबंगाल काय, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.




पैठण तालुक्यात अधिकृत वाळू घाटांचा लिलाव झालेला नसताना एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाळू येते कुठून, तसेच या वाहतुकीसाठी आवश्यक परवानग्या आणि रॉयल्टीच्या पावत्या आहेत का, याची तपासणी होणे गरजेचे आहे. शेजारच्या जिल्ह्यातील वाळू घाटांच्या परवानगीचा आधार घेऊन वाहतूक केली जात असेल, तर त्या परवानग्यांची वैधता आणि वाळूचा स्रोत तपासण्याची आवश्यकता आहे. विशेष म्हणजे, पैठण शहर व परिसरात आरटीओचे पथक कार्यरत असतानाही या मार्गावरील ओव्हरलोड वाळू वाहतुकीवर प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे. वाहतूक पोलीस, स्थानिक पोलीस आणि महसूल विभागाच्या हद्दीतून ही वाहने जात असताना संबंधित यंत्रणांना याची माहिती नाही का, असा सवाल उपस्थित होत आहे.

**अपघातानंतरच प्रशासनाला जाग येणार का?**

क्षमतेपेक्षा अधिक वाळू वाहून नेणाऱ्या हायवांमुळे रस्त्यावरील अन्य वाहनचालकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो. एखादी गंभीर दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन कारवाई करणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर पैठण-छत्रपती संभाजीनगर मार्गावरील वाळू वाहतुकीची संयुक्त तपासणी करावी, वाहनांची वजनमर्यादा, वाहतूक परवाने आणि रॉयल्टी पावत्यांची पडताळणी करावी, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. आता संबंधित विभाग या प्रकाराची दखल घेऊन प्रत्यक्ष कारवाई करतात का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अध्यात्म चिंतनरूपी औषधातून जीवनाला नवी दिशा

**कृष्णानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त २५ ऑक्टोबरला 'को जागर्ति' प्रवचन सेवा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री क्षेत्र सोनई येथील प.पू. कृष्णानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त स्वामी कृष्णानंद आयुर्वेदालयाच्या वतीने रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता 'को जागर्ति' या प्रवचन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. दादेगाव येथील श्री देवदास स्वामी मठाचे, समर्थ भक्त प.पू. मंदारबुवा रामदासी हे यावेळी प्रवचनातून भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच श्री क्षेत्र सोनई येथील श्री रेणुका दरबार येथून प पू यज्ञेश्वर महाराज, छ संभाजीनगर येथून श्री हरिहर सद्गुरु शक्तिपीठ येथील प पू अंबरीश महाराज तथा प पू अनिरुद्ध महाराज यांची उपस्थिती कार्यक्रमाचे प्रसंगी असणार आहे.




हा कार्यक्रम पालवी शिशु विहार, शुभमंगल कार्यालय, सावेडी नाका येथे होणार आहे.

संतांचे चरित्र आणि त्यांच्या विचारांचा अभ्यास प्रत्येक व्यक्तीने करणे आवश्यक आहे, असे शास्त्र सांगते. शरीर, मन आणि बुद्धी यांच्याही पलीकडे जाऊन केलेले अध्यात्म चिंतन उत्तम आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. आधुनिक संशोधनातूनही अध्यात्म चिंतनाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. आयुर्वेदानुसारही अध्यात्म चिंतन ओजवर्धन करणारे मानले गेले आहे. त्यामुळे सकारात्मक विचार, मानसिक स्वास्थ्य आणि जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी अध्यात्म चिंतन महत्त्वाचे ठरते.

प.पू. कृष्णानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या नावाने सुरू झालेले स्वामी कृष्णानंद आयुर्वेदालय आयुर्वेद सेवेच्या माध्यमातून कार्यरत आहे. या आयुर्वेदालयाच्या वतीने अध्यात्म चिंतनरूपी औषध समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या प्रवचन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री समर्थ भक्त प.पू. मंदार बुवा रामदासी यांच्या प्रवचनातून संतविचार आणि अध्यात्माचे महत्त्व उलगडले जाणार आहे. या प्रवचन सेवेचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी कृष्णानंद आयुर्वेदालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री रामदेव भक्त मंडळ स्टच्या वतीने ललिता पंचमीचे औचित्य साधून रंगला धार्मिक सोहळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री रामदेव भक्त मंडळ (ट्रस्ट) आयोजित शारदीय नवरात्रोत्सव अंतर्गत गुरुवारी (दि. १५ ऑक्टोबर) ललिता पंचमीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून ललिता सहस्रनाम कुंकुमार्चन कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात संपन्न झाला. सारसनगर, औसरकर मळा येथे झालेल्या या धार्मिक कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. देवीच्या नामस्मरणाने आणि धार्मिक विधींनी नवरात्रोत्सवाच्या उत्साहात आणखी भर पडली.

शारदीय नवरात्रोत्सव हा देवीच्या उपासनेचा आणि शक्तीच्या आराधनेचा महत्त्वपूर्ण उत्सव मानला जातो. नवरात्रातील प्रत्येक दिवसाला धार्मिक महत्त्व असून, ललिता पंचमीच्या दिवशी देवी ललितेची विशेष पूजा-अर्चा केली जाते. याच पार्श्वभूमीवर श्री रामदेव भक्त मंडळाच्या वतीने ललिता सहस्रनाम कुंकुमार्चन या विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी धार्मिक विधींनी झाली. ललिता सहस्रनामाचे पठण करीत देवीची भक्तिभावाने पूजा करण्यात आली. कुंकुमार्चनाच्या माध्यमातून देवीच्या चरणी श्रद्धा अर्पण करण्यात आली. देवीच्या नामाचा गजर, मंत्रोच्चार आणि पूजाविधींमुळे संपूर्ण वातावरण मंगलमय झाले होते. भाविकांनी श्रद्धेने या धार्मिक सोहळ्यात सहभाग नोंदवून देवीचे आशीर्वाद घेतले.

श्री रामदेव भक्त मंडळाच्या वतीने दरवर्षी शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांच्या माध्यमातून भाविकांना देवीची आराधना करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जात आहे.

स्टच्या नवरात्रोत्सवासाठी नरेंद्र फिरोदिया व फिरोदिया परिवार यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. तसेच आशिष, अजय व रमेश पोखरणा व परिवार, सौ. इंदुमती, अतुल व अभय पारख व परिवार यांचे सहकार्य लाभले आहे. विशेष योगदानासाठी गौरव फिरोदिया, छायाताई फिरोदिया परिवार यांचाही सहभाग आहे.

# महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात निदर्शने

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मंजूर सौर ऊर्जा क्षमता वाढीची नोंद प्रणालीमध्ये अद्ययावत न केल्याने तसेच चुकीच्या नोंदींमुळे अवाजवी वीजबिले आकारली जात असल्याचा आरोप करत महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने निदर्शने करण्यात आली. या प्रकरणातील तक्रारदार राहुल आढाव यांनी बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी शहरातील महावितरण विभागीय कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. मंजूर पाच किलोवॅट सौर क्षमतेची अधिकृत नोंद करून सुधारित वीजबिल द्यावे, मागील दीड ते दोन वर्षांतील सोलर बँक युनिट्सचा हिशोब करावा आणि सुरक्षा ठेवेसंदर्भातील नोंदी दुरुस्त कराव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.
या आंदोलनात अ‍ॅड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, राहुल आढाव, आनंदा आढाव, वीर बहादूर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, बाळासाहेब पालवे, ऋषिकेश आढाव आदी सहभागी झाले होते. राहुल आढाव यांनी आपल्या घरावरील मूळ तीन किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा यंत्रणेत अतिरिक्त दोन किलोवॅटची वाढ मंजूर करून घेतली होती. त्यामुळे त्यांच्या सौर यंत्रणेची एकूण मंजूर क्षमता पाच किलोवॅट झाली होती. मात्र, महावितरणचे कर्मचारी, अधिकारी आणि संबंधित व्हेंडर यांच्या निष्काळजीपणामुळे ही वाढ वीज वितरण प्रणालीमध्ये वेळेत अद्ययावत करण्यात आली नाही, असा आरोप करण्यात आला आहे.

# मखदुम सोसायटी तर्फे थोर समाजसुधारक सर सय्यद अहमद खान यांची जयंती साजरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सर सय्यद अहमद खान यांनी समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून माणसाला विचारशील, आत्मनिर्भर आणि प्रगत बनविण्याचे माध्यम आहे, हा संदेश त्यांच्या कार्यातून मिळतो.

त्यांनी आधुनिक विज्ञान, इंग्रजी शिक्षण आणि सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या मते, समाजाची खरी प्रगती ही शिक्षण आणि ज्ञानाच्या बळावरच होऊ शकते. आजच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन चांगले शिक्षण घ्यावे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करावा आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे. सर सय्यद अहमद खान यांचे जीवनकार्य आजही विद्यार्थ्यांसाठी आणि समाजासाठी प्रेरणादायी आहे. शिक्षण, ज्ञान आणि सामाजिक प्रबोधनाचा त्यांनी दिलेला संदेश प्रत्येक पिढीपर्यंत पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.असे प्रतिपादन प्रोफेसर नवेद बिजापुरे यांनी केले.



मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने आलमगीर येथील मातोश्री उर्दू हायस्कूल येथे आधुनिक शिक्षणाचे पुरस्कर्ते, महान विचारवंत आणि समाजसुधारक सर सय्यद अहमद खान यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रोफेसर नवेद बिजापुरे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक जमीर अहमद शेख, शेख एजाज, शेखमेहनाज,शेख अंजुम, तंबोली नसरीन, सय्यद आफरीन उपस्थित होते.

पुढे बोलताना बिजापूरे म्हणाले की सर सय्यद अहमद खान यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची प्रगती साधता येते, हा विचार त्यांनी समाजासमोर मांडला. विशेषतः मुस्लिम समाजात आधुनिक शिक्षणाचा प्रसार व्हावा, यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यांनी शिक्षण, विज्ञान, सामाजिक सुधारणा आणि वैचारिक प्रगती यांना महत्त्व दिले. सन १८७५ मध्ये त्यांनी अलीगड येथे मोहम्मेडन अँग्लो-ओरिएंटल कॉलेजची स्थापना केली. याच संस्थेचे पुढे अलीगड मुस्लिम विद्यापीठात रूपांतर झाले. त्यांच्या कार्यामुळे आधुनिक शिक्षणाच्या क्षेत्रात नवी दिशा निर्माण झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खान निशात अंजुम यांनी केले.आभार जमीर शेख यांनी मानले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### दुष्काळाची कारणे आणि घ्यावयाची खबरदारी यावर रंगणार कवितांचा जागर!

अहिल्यानगर- दुष्काळाची कारणे, त्याचे परिणाम आणि दुष्काळी परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी याविषयी जनजागृती व्हावी, तसेच नवोदित कवींच्या लेखनकौशल्याला आणि काव्यप्रतिभेला हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने निमगाव वाघा येथे भव्य काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डांगरे डोंगरे व्यायामशाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दुष्काळासारख्या गंभीर सामाजिक प्रश्नावर काव्यलेखनातून जनजागृती घडवून आणणाऱ्या या उपक्रमात जास्तीत जास्त कवींनी सहभागी व्हावे, असे आवाहन डोफ्लगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी केले आहे.स्पर्धेसाठी 'दुष्काळाची कारणे, घ्यावयाची खबरदारी' हा विषय निश्चित करण्यात आला आहे. या विषयाच्या माध्यमातून दुष्काळामागील कारणांचा वेध घेतानाच पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, पाण्याचे नियोजन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पाणी बचतीचे महत्त्व कवितेतून मांडण्याची संधी स्पर्धकांना मिळणार आहे.या काव्यलेखन स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कवींनी आपली कविता २८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत आयोजकांनी निश्चित केलेल्या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कविता कोणत्याही काव्यप्रकारात लिहिता येणार असून, ती अर्थपूर्ण असणे आवश्यक आहे. स्पर्धकांनी विषयाची व्याप्ती लक्षात घेऊन आपल्या कवितेतून दुष्काळाची वस्तुस्थिती, पाणीटंचाईची तीव्रता आणि त्यावरील उपाय प्रभावीपणे मांडावेत, अशी अपेक्षा आहे.

### नवरात्रोत्सवात निमगाव वाघात रांगोळीतून स्वच्छतेचा जागर!

अहिल्यानगर- नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे नवरात्रोत्सव आणि विजयादशमीचे औचित्य साधून रांगोळीच्या माध्यमातून स्वच्छतेचा जागर करण्यात आला. रंगीबेरंगी रांगोळ्यांतून सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य आणि स्वच्छ गावाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमामुळे धार्मिक उत्सवाला सामाजिक जाणीवेची जोड देऊन दर्शनासाठी आलेल्या भाविकांना स्वच्छतेचे महत्त्व सांगण्यात आले.जिल्हा परिषदेच्या 'नवरात्री स्वच्छता उत्सव' या उपक्रमांतर्गत स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. विजयादशमीनिमित्त गावातील खंडोबा मंदिराच्या सभामंडपात स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या विविध आकर्षक रांगोळ्या साकारण्यात आल्या होत्या.या रांगोळ्यांमधून 'स्वच्छ गाव, सुंदर गाव', 'स्वच्छतेतून आरोग्य, स्वच्छतेतून समृद्धी' यांसारखे संदेश देण्यात आले. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे, परिसर अस्वच्छ होऊ न देणे आणि स्वच्छतेच्या सवयी दैनंदिन जीवनात अंगीकारणे, यांचे महत्त्व या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले. धार्मिक स्थळावर येणाऱ्या भाविकांचा या रांगोळ्यांनी लक्ष वेधले.स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सामाजिक प्रबोधनाचा उपक्रम पार पडला. युवती दिपाली अंधारे हिने स्वच्छतेचे विविध संदेश देणाऱ्या रांगोळ्या रेखाटल्या. कलात्मकतेची जोड देत सामाजिक विषय लोकांपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमातून प्रयत्न करण्यात आला.

### रांजणगाव मशिदमध्ये कुळ कायद्याच्या नियमांची पायमल्ली करून फेरफार मंजूर केल्याचा आरोप

अहिल्यानगर- पारनेर तालुक्यातील रांजणगाव मशिद येथील गट क्रमांक १९५ आणि २५५ मधील जमीन फेरफार प्रकरणावरून महसूल विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. विभागीय आयुक्तांनी यापूर्वी फेरफार क्रमांक ३५४४ रद्द करण्याचे आदेश दिलेले असताना, संबंधित तलाठी व मंडळाधिकाऱ्यांनी आवश्यक नोटीस न देता फेरफार क्रमांक ८०३० मंजूर करण्यात आला आहे. तसेच कुळ कायद्याच्या नियमांची पायमल्ली करून फेरफार मंजूर झाल्याचा देखील आरोप करण्यात आला आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच फेरफार क्रमांक ८०३० नामंजूर करावा, अशी मागणी समितीच्या वतीने करण्यात आली आहे. मागण्यांवर एका महिन्यात कार्यवाही न झाल्यास पीडितांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.समितीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# धार्मिक कार्यातून संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचतात – आमदार संग्राम जगताप

### श्री जय तुळजाभवानी माता मंदिरात सभामंडप कामाचे भूमिपूजन
### आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते शुभारंभ; भाविकांची गैरसोय दूर होणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील पाइपलाइन रोड येथील श्री जय तुळजाभवानी माता मंदिरात सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी, तसेच वर्षभर धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करता यावे, या उद्देशाने देवस्थानच्या वतीने सभामंडप उभारण्यात येत आहे. या सभामंडपामुळे भाविकांची गैरसोय दूर होण्यास मदत होणार असून, धार्मिक कार्यक्रमांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, श्री जय तुळजाभवानी माता मंदिर हे अहिल्यानगर शहरातील भाविकांचे श्रद्धास्थान असून, येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सभामंडपाचे काम हाती घेण्यात आले आहे. या सभामंडपाच्या माध्यमातून वर्षभर विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील.

धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचविले जातात. संतांचे विचार समाजाला योग्य दिशा देण्याचे काम करतात. सण-उत्सवांच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा जपली जाते. हा सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. देवस्थानच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या सभामंडपाच्या कामासाठी सर्वतोपरी सहकार्य राहील, असे आश्वासन आमदार जगताप यांनी दिले.



धनश्री सुजय विखे पाटील म्हणाल्या की, धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील नागरिक एकत्र येतात आणि विचारांची देवाणघेवाण करतात. सभामंडपाच्या उभारणीमुळे मंदिरात विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम अधिक उत्साहात आयोजित करता येतील. यामुळे भाविकांची गैरसोय दूर होऊन त्यांना कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी चांगली सुविधा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले.

देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे म्हणाले की, श्री तुळजाभवानी माता मंदिर हे अहिल्यानगरची देवी म्हणून ओळखले जाते. मंदिर परिसरात भव्य सभामंडप उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामासाठी भक्तगणांनी सहकार्य करावे. सभामंडपामुळे भाविकांची गैरसोय दूर होणार असून, वर्षभर विविध धार्मिक आणि आध्यात्मिक उपक्रमांसाठी या जागेचा उपयोग करता येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

या भूमिपूजनप्रसंगी धनश्री सुजय विखे पाटील, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब पवार, डॉ. सागर बोरुडे, नगरसेविका शारदाताई ढवण, अशोक गायकवाड, करण कराळे, सतीश शिंदे, प्रशांत भालेराव, ओमप्रकाश तिवारी, दत्तात्रय तांबे, नवनाथ आंधळे, स्मिता शितोळे, सागर पुंड यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्धच्या तक्रारींवर कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे 'महाराष्ट्र राज्य कारवाई आयोग' स्थापन करा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध नागरिकांनी केलेल्या भ्रष्टाचार, कर्तव्यच्युती, गैरवर्तन, अधिकारांचा गैरवापर आणि प्रशासकीय निष्क्रियतेच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून विहित कालमर्यादेत अंतिम कारवाई करण्यासाठी स्वतंत्र वैधानिक 'महाराष्ट्र राज्य कारवाई आयोग' स्थापन करावा, अशी मागणी अभय ललवाणी यांनी मुख्यमंत्री व मुख्य सचिव यांच्याकडे ई मेल निवेदनाद्वारे केली आहे.

शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध तक्रारी केल्यानंतर अनेकदा चौकशीला विलंब होतो, तक्रारी दीर्घकाळ प्रलंबित राहतात आणि तक्रारदारांना वारंवार पाठपुरावा करावा लागतो. काही प्रकरणांमध्ये संबंधित विभागाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचे उघडपणे दिसते. त्यामुळे प्रशासनातील उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रस्तावित आयोगाला स्वतंत्र चौकशी करणे, आवश्यक कागदपत्रे मागविणे, दोषी आढळणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कारवाईसाठी निर्देश देणे आणि तक्रारींवरील अंतिम कार्यवाहीचा पाठपुरावा करणे असे वैधानिक अधिकार द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच तक्रारींच्या प्रत्येक टप्प्यासाठी निश्चित कालमर्यादा, ऑनलाइन तक्रार नोंदणी व स्थिती जाणून घेण्याची सुविधा आणि तक्रारींवर जाणीवपूर्वक कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची व्यवस्था असावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

या प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ समिती गठित करून स्वतंत्र कायद्याचा मसुदा तयार करावा, तसेच विद्यमान लोकायुक्त व्यवस्था, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि इतर वैधानिक यंत्रणांशी समन्वय निश्चित करावा, अशी विनंतीही ललवाणी यांनी केली आहे.

नागरिकांना कायद्याच्या चौकटीत न्याय मिळावा, तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे आणि प्रशासकीय कारभारात पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढावे, हा या प्रस्तावामागील मुख्य उद्देश असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## अहिल्यानगरात १नोव्हेंबरला माळी समाजाचा वधू-वर परीचय मेळावा,माजी आमदार पांडुरंग अभंग यांना निमंत्रण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर सकलमाळी समाज संस्था आयोजित माळी वधू-वर परिचय मेळावा रविवार दि.१ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायं.४ वा.बंधन लॉन्स, सावेडी,अहिल्यानगर येथे होणार आहे.या मेळाव्याचे निमंत्रण नेवासा-शेवगाव मतदार संघाचे माजी आमदार पांडुरंग अभंग यांना देण्यात आले.



याप्रसंगी तरवडी येथील सामाजिक कार्यकर्ते उत्तमराव पाटील,यशवंत (बंडु) पाटील,सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,कोअर कमिटीचे उद्योजक राजेंद्र ताठे, इंजि.चंद्रकांत पुंड,कॅप्टन सुधीर पुंड,विश्वस्त अनिल इवळे,सचिव अमोल भांबरकर,शुभम ताठे आदी उपस्थित होते.

या मेळाव्याचे उद्घाटक म्हणून इतर मागास बहुजन कल्याण मंत्री मा.ना.अतुलजी सावे तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार योगेश टिळेकर(प्रदेशाध्यक्ष, भाजप ओबीसी मोर्चा) हे उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून उपमहापौर धनंजय जाधव हे असून कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर डागवाले व आयोजक बाळासाहेब भुजबळ हे आहेत.

यावेळी माजी आमदार पांडुरंग अभंग म्हणाले, ''सर्वप्रथम मी सकल माळी समाज संस्थेचे मनापासून अभिनंदन करतो. आज काळाची गरज ओळखून तुम्ही जो वधू-वर परिचय मेळावा आयोजित केला आहे, हा अत्यंत स्तुत्य आणि समाजाला दिशा देणारा उपक्रम आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्या मुला-मुलींसाठी योग्य जोडीदार शोधणे हे पालकांसमोर मोठे आव्हान झाले आहे. या मेळाव्याला समाजाने मोठी उपस्थिती दाखवावी.

लग्न जमविणे हा समाजाचा मोठा प्रश्न आहे. वधू-वर मेळावा घेऊन अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेने समाजाचा प्रश्न सोडविण्यासाठी वधूवर परीचय मेळाव्याचे आहे,ही कौतुकास्पद बाब आहे,असे मत नेवासा-शेवगावचे माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी व्यक्त केले.

## ज्ञानेशकुमार यांच्या प्रतीकात्मक रावणाचे शहरातील हुतात्मा स्मारकात दहन!

### राजीनाम्यासह निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीची चौकशी करण्याची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय लोकशाहीत मतदारांचे सार्वभौमत्व, मतदानाचा अधिकार आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण झाले पाहिजे, अशी भूमिका मांडत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने विजयादशमीच्या निमित्ताने अहिल्यानगर शहरातील हुतात्मा स्मारक येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या प्रतीकात्मक रावणाचे दहन करुन त्यांना नरकांजली वाहण्यात आली. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत संघटनांनी या उपक्रमातून निषेध नोंदविला. ज्ञानेशकुमार यांनी राजीनामा द्यावा, तसेच मतदारयादी पुनरीक्षण प्रक्रियेतील कथित अनियमिततांची स्वतंत्र चौकशी करावी, अशा मागण्या संघटनांकडून करण्यात आल्या.

विजयादशमी हा अनिष्ट प्रवृत्तींवर विजय मिळविण्याचा संदेश देणारा सण आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण आणि घटनात्मक संस्थांचे उत्तरदायित्व या मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यासाठी प्रतीकात्मक रावणदहनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे संघटनांनी स्पष्ट केले. निवडणूक आयोगाने लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संविधाननिष्ठ नैतिकता आणि कायद्याचे राज्य या मूल्यांना प्राधान्य द्यावे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. यावेळी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, वीर बहादूर प्रजापती, बबलू खोसला, शाहीर कान्हू सुंबे, आनंद आढाव, राहुल आढाव आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर टीका करताना मतदारांचे सार्वभौमत्व हे संसदीय लोकशाहीचे मूलभूत अधिष्ठान असल्याचे नमूद केले. कोणत्याही पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अन्यायकारक पद्धतीने बाधित होता कामा नये. मतदारयादीतील त्रुटी दूर करताना पात्र मतदारांची नावे वगळली जाणार नाहीत, याची दक्षता घेणे आवश्यक आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

देशभरातील विशेष सखोल मतदारयादी पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान सुमारे १३ कोटी मतदारांची नावे प्रारूप मतदारयाद्यांमधून वगळण्यात आल्याचा मुद्दा संघटनांनी उपस्थित केला. या संदर्भात पात्र मतदारांची नावे चुकीने वगळली गेली असल्यास त्यांची स्वतंत्र पडताळणी करून संबंधित मतदारांना यादीत पुन्हा समाविष्ट होण्याची न्याय्य संधी मिळाली पाहिजे, अशी मागणी करण्यात आली.

## रिपाइंचे जोडे मारो आंदोलन!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या वतीने अहिल्यानगर शहरात सुरू असलेल्या साखळी उपोषणाचा मंगळवारी (दि. २० ऑक्टोबर) बारावा दिवस होता. विजयादशमीचे औचित्य साधून पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांची प्रतीकात्मक रावण प्रतिकृती तयार करून तिला जोडे मारो आंदोलन केले. लोकशाहीतील मतदानाच्या पवित्र अधिकाराचे हरण केल्याचा आरोप करत आंदोलकांनी ज्ञानेशकुमार यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली आणि त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर हे साखळी उपोषण सुरू आहे. विजयादशमीच्या पार्श्वभूमीवर आंदोलनकर्त्यांनी ज्ञानेशकुमार यांच्या कार्यपद्धतीचा निषेध करण्यासाठी प्रतीकात्मक रावणाची प्रतिकृती तयार केली. लोकशाहीत मतदारांचा मतदानाचा अधिकार सर्वोच्च असून, या अधिकाराचे संरक्षण करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. यावेळी ज्ञानेशकुमार हे आजच्या युगातील रावण असल्याचा आरोपही करण्यात आला.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी पदाचा राजीनामा द्यावा, मतदारयादीतील कथित अनियमिततांची सखोल चौकशी करण्यात यावी आणि या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपाइंच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली. विशेष सखोल मतदारयादी पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेबाबतही आंदोलकांनी विरोध दर्शविला. ही प्रक्रिया रद्द करण्यात यावी, अशी मागणी करत निवडणूक प्रक्रियेतील कथित त्रुटी आणि मतदारांच्या अधिकारांच्या संरक्षणाचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

मतदारयादीतील अनियमिततांमुळे पात्र मतदारांच्या मतदानाच्या अधिकारावर परिणाम होऊ नये. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष असावी, तसेच मतदारांच्या तक्रारींची योग्य दखल घेतली जावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या साखळी उपोषणाला मंगळवारी बारा दिवस पूर्ण झाले. विजयादशमीच्या दिवशी प्रतीकात्मक रावणाला जोडे मारून निषेध व्यक्त करत आंदोलकांनी आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत राजीनाम्याची मागणी लावून धरली.

## इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' व 'लेखक-वाचक सुसंवाद' उत्साहात साजरा





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बी.पी.एच.ई. सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (आय.एम.एस.सी.डी.आर.), अहिल्यानगर येथील लर्निंग रिसोर्स सेंटरतर्फे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' आणि 'लेखक-वाचक सुसंवाद' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानाची जिज्ञासा वाढवणे आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. संस्थेला एन.ए.ए.सी., बेंगळुरू यांच्याकडून पुनर्मान्यता प्राप्त झाली असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ट संस्था' पुरस्कारही मिळाला आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून व्यवस्थापन शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेच्या लर्निंग रिसोर्स सेंटरला डिस्कव्हरी मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, नवी दिल्ली यांच्याकडून 'बी-स्कूल लायब्ररी पुरस्कार' प्राप्त झाला आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम आणि संस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. हिवाळे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक व स्वागतपर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास उपसंचालक डॉ. विक्रम बार्नाबस, श्री. गिरीश टोकसिया, ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नाबस, तसेच स्टुडंट लायब्ररी कमिटीचे सदस्य आणि प्रा. गौरी पाटील, प्रा. श्रुती राव व प्रा. सायली तोरणे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. सुमेध गुप्ते हे बिझनेस स्टँडर्ड या अग्रगण्य आर्थिक दैनिकाचे महाराष्ट्र व गुजरात विभागाचे वेस्ट सेल्स हेड म्हणून कार्यरत आहेत. त्यांना मुद्रित माध्यम क्षेत्रात तीन दशकांहून अधिक काळाचा अनुभव असून, प्रसार, जाहिरात, ब्रँडिंग, विपणन आणि उत्पादन विकास या क्षेत्रांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी द इंडियन एक्सप्रेस, लोकसत्ता, लोकप्रभा, मिड-डे आणि सकाळ यांसारख्या वृत्तपत्रे व प्रकाशनांशी संबंधित विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. मिड-डेच्या पुणे आवृत्तीच्या तसेच सकाळच्या औरंगाबाद आवृत्तीच्या प्रारंभातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पुणे विद्यापीठातून पदवी आणि एमबीए शिक्षण पूर्ण केलेल्या श्री. गुप्ते यांनी आपल्या प्रदीर्घ व्यावसायिक अनुभवातून विद्यार्थ्यांशी माध्यम क्षेत्र, व्यवसाय, विपणन, ब्रँडिंग आणि व्यावसायिक विकास या विषयांवर संवाद साधला.

त्यांच्या मार्गदर्शनपर सत्रात सकारात्मक दृष्टिकोन, सृजनशीलता, नावीन्यपूर्ण विचारसरणी, आत्मप्रेरणा, आत्मविश्वास आणि कामाप्रती समर्पण या यशस्वी व्यवस्थापनासाठी आवश्यक गुणांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. प्रभावी संवादकौशल्य, नातेसंबंध निर्माण करण्याची क्षमता, संघाचे नेतृत्व, शांत व संयमी मनाने निर्णय घेणे, एकाच वेळी विविध जबाबदाऱ्या पार पाडणे आणि आर्थिक व्यवस्थापन यांसारख्या कौशल्यांचे महत्त्व त्यांनी व्यावहारिक उदाहरणे व चालू घडामोडींवरील प्रश्नांच्या माध्यमातून स्पष्ट केले. कॉर्पोरेट जगतातील विविध अनुभव आणि उदाहरणांमुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक क्षेत्रातील संधी, आव्हाने आणि अपेक्षा यांची जाणीव झाली. जबाबदारीची जाणीव, उद्दिष्टपूर्ती आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर सक्षम नेतृत्वगुण विकसित करून भारताच्या प्रगतीत योगदान देण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना श्री. गुप्ते यांनी मार्गदर्शनपर उत्तरे दिली. या संवादात्मक सत्रातून विद्यार्थ्यांना अनुभवी व्यावसायिकाच्या कार्यप्रवासातून शिकण्याची आणि प्रेरणा घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्टुडंट लायब्ररी कमिटीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत नियोजन, व्यवस्थापन आणि अंमलबजावणीत मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाची सुरुवात करून गौरी बनसोडे यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली.तर पाहुण्यांचा सत्कार व आदरातिथ्य यासंबंधी निवेदन साई चासकर यांनी केले. रिफ्रेशमेंट कूपन वाटप आणि आभार प्रदर्शनाची जबाबदारी वैभवी कदम यांनी पार पाडली.कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी रील्स व शॉर्ट व्हिडिओ तयार करण्याचे काम वैभवी कदम, श्रुती सागर, मुस्कान सय्यद आणि मसीरा सय्यद यांनी केले. श्वेता वीर, ऐश्वर्या राऊत आणि दीपिका गोरे यांनी फोटोग्राफी व जिओ-टॅग केलेली छायाचित्रे काढण्याची जबाबदारी सांभाळली. पाहुण्यांच्या स्वागतासाठी श्री. धनराज घोडके आणि श्री.जितीन आढाव यांनी सहकार्य केले, तर स्टेज वर्क आणि कार्यक्रम व्यवस्थापनाची जबाबदारी अमृता पटेल आणि राजेश कांबळे यांनी पार पाडली.स्टुडंट लायब्ररी कमिटीचा लोगो व बॅज तयार करण्याचे काम सुयश गांधी आणि धनराज घोडके यांनी केले.

# सन फार्मा विद्यालयात अंधश्रद्धेविरोधात विज्ञानवादी विचारांचा जागर

**आरएसपीचा उपक्रम; विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न**
**विद्यार्थ्यांनी जाणून घेतली बुवाबाजीतील हातचलाखी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बालवयात अंधश्रद्धा बाजूला सारून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या उद्देशाने सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) वतीने 'विज्ञान जागर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अंनिसच्या वतीने विविध वैज्ञानिक प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचा आणि त्यांच्या मनातील जिज्ञासा वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अहिल्यानगरचे प्रधान सचिव टी. के. जगधने यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या भाषणात दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे महत्त्व आणि अंधश्रद्धेचे दुष्परिणाम यांवर प्रकाश टाकला. प्रत्येक गोष्टीमागील कार्यकारणभाव शोधणे किती गरजेचे आहे, हे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब सातपुते, विनायक सापा, टी. के. जगधने आणि आरएसपी अधिकारी राजेंद्र धस यांनी कै. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा यांनी अनेक चमत्कार वाटणाऱ्या प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर करून त्यामागील वैज्ञानिक सत्य विद्यार्थ्यांसमोर उलगडले. तथाकथित चमत्कार किंवा बुवाबाजीमध्ये हातचलाखीने वापरल्या जाणाऱ्या क्लृप्त्या कशा प्रकारे विज्ञानाच्या आधारे सादर केल्या जातात, हे त्यांनी विविध प्रयोगांद्वारे दाखवून दिले. या सादरीकरणानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब सातपुते, ससे, बारस्कर, श्रीमती महांडुळे, भोगे मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष संपतराव बारस्कर यांनी अंनिसच्या या उपक्रमाचे कौतुक केले. अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या आणि बुवाबाजी करणाऱ्या भोंदू व्यक्तींपासून समाजाचे संरक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः जागरूक होऊन पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत सकारात्मक बदल घडण्यास मदत होते, असे मत आरएसपी अधिकारी राजेंद्र धस यांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी बारस्कर सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जलजीवन योजनेतून मुदळ वस्तीला जाणीवपूर्वक वगळले?

**। संपूर्ण अरणगावला पाणी, मात्र मुदळ वस्ती तहानलेली! टँकर मागितला तर 'जलजीवन योजनेत गाव आहे'चे उत्तर; मग प्रत्यक्ष पाणी कुठे गेले? । सरपंचांपासून अधिकाऱ्यांपर्यंत जबाबदारी निश्चित करा!**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एकीकडे शासनाच्या जलजीवन मिशनमधून 'हर घर जल'चा गाजावाजा केला जात असताना, दुसरीकडे नगर तालुक्यातील अरणगाव येथील मुदळ वस्तीला मात्र पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. संपूर्ण गावात जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे करण्यात आली; मात्र सुमारे ३०० नागरिकांची मागास वस्ती असलेल्या मुदळ वस्तीला या योजनेतून वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सध्या दुष्काळी परिस्थिती असताना या वस्तीतील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त होत आहे.

**गावात जलजीवनचे पाणी, मग मुदळ वस्तीवर अन्याय का?**

अरणगावमध्ये जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे झाली; मात्र मुदळ वस्तीपर्यंत पाणीपुरवठ्याची पाइपलाइन टाकण्यात आली नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित वस्तीचा योजनेच्या अंदाजपत्रकात आणि निविदेच्या कामात समावेश नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे गावातील इतर भागांना पाण्याची सुविधा मिळत असताना मुदळ वस्तीतील नागरिकांना मात्र मूलभूत सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे.

सरपंचांच्या भूमिकेवर ग्रामस्थांचे गंभीर प्रश्न

मुदळ वस्तीला जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठ्यापासून वंचित ठेवण्यात आल्याप्रकरणी ग्रामस्थांनी सरपंचांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. वस्तीचा योजनेत समावेश होऊ नये, यासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले का? वस्तीचा समावेश करण्याची मागणी असतानाही त्याकडे दुर्लक्ष का झाले? या प्रश्नांची उत्तरे ग्रामस्थांना हवी आहेत. मात्र, या आरोपांची स्वतंत्र चौकशी होऊन वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

**टँकर मागायचा तरी अडचण; 'गाव योजनेत आहे'चे कारण!**

या संपूर्ण प्रकरणातील सर्वाधिक गंभीर बाब म्हणजे सध्या दुष्काळी परिस्थितीत मुदळ वस्तीला पिण्याचे पाणी



उपलब्ध होत नसल्याची तक्रार आहे. ग्रामस्थांनी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची मागणी केल्यास, 'तुमचे गाव जलजीवन मिशनमध्ये आहे,' असे सांगून टँकर देता येणार नसल्याचे उत्तर मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, योजनेत गावाचा समावेश असणे आणि प्रत्येक वस्तीपर्यंत प्रत्यक्ष पाणी पोहोचणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. पाइपलाइनच नसलेल्या वस्तीला केवळ कागदोपत्री योजनेचा आधार देऊन टँकर नाकारणे कितपत योग्य आहे? पाणीपुरवठ्याची सुविधा प्रत्यक्ष उपलब्ध नसताना नागरिकांनी पाणी आणायचे तरी कुठून, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

**अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचे उंबरठे झिजवूनही उपयोग नाही!**

मुदळ वस्तीतील नागरिकांनी या समस्येबाबत ग्रामपंचायतीपासून वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधींपर्यंत पाठपुरावा केल्याचे निवेदनात म्हटले आहे. ग्रामपंचायत अरणगाव येथे यापूर्वी अर्ज करूनही प्रश्न सुटलेला नसल्याची त्यांची तक्रार आहे. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळी उत्तरे मिळत असल्याने नेमकी जबाबदारी कोणाची, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. नगर तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि जलजीवन मिशनच्या संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालणे गरजेचे आहे. मुदळ वस्तीचा योजनेत समावेश का झाला नाही? मंजूर अंदाजपत्रकात आणि निविदेत या वस्तीचा समावेश होता की नव्हता? नसेल, तर त्यामागचे कारण काय? या प्रक्रियेत कोणाची भूमिका होती? तसेच वस्तीला पाणी मिळू नये यासाठी कोणाचा दबाव होता का, याचीही निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

**दुष्काळात तहानलेल्या नागरिकांना आश्वासनांचे नव्हे, पाण्याचे टँकर हवेत!**

मुदळ वस्तीतील विहिरींचे पाणी आटल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या अधिक गंभीर झाल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे. महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत तांत्रिक कारणे, कागदपत्रे आणि योजनेचा दाखला देत नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रलंबित ठेवणे योग्य ठरणार नाही. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे सहा प्रमुख मागण्या केल्या आहेत. मुदळ वस्तीतील पाणीटंचाईची प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल तयार करावा, जलजीवन मिशनच्या मंजूर अंदाजपत्रकाची व कामाच्या आराखड्याची तपासणी करावी, सुमारे ३०० नागरिकांसाठी आवश्यक पाइपलाइन व नळजोडणीच्या कामाला नियमानुसार मंजुरी द्यावी, संबंधित अधिकाऱ्यांना तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, पाइपलाइनचे काम पूर्ण होईपर्यंत पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करावी आणि केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**आता प्रशासन उत्तर देणार का?**

गावातील एका वस्तीला पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर जलजीवन मिशनच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची वेळ आली आहे. मुदळ वस्तीला योजनेतून वगळण्यामागचे नेमके कारण काय, याची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी. तसेच तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करून कायमस्वरूपी पाइपलाइनची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. 'हर घर जल'च्या घोषणांमध्ये मुदळ वस्तीचा घसा कोरडाच राहणार का? आता तरी प्रशासनाने जागे होऊन या प्रश्नावर ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# धनंजय निमसे राष्ट्रवादी काँग्रेस वाहतूक सेलच्या राज्यप्रमुखपदी

**आ. दातेंच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या संघटनात्मक विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत गोवर्धन उर्फ धनंजय निमसे यांची महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाहतूक सेलच्या राज्यप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते आ. काशिनाथ दाते व आ. शिवाजीराव गर्जे यांचे उपस्थित निमसे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

गोवर्धन निमसे यांच्यावर राज्यस्तरीय जबाबदारी सोपविण्यात आल्याने वाहतूक क्षेत्रातील संघटनात्मक कामाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. वाहतूक क्षेत्रातील कार्यकर्त्यांची बांधणी, त्यांच्या प्रश्नांना संघटनात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि पक्षाचे कार्य राज्यभर अधिक प्रभावीपणे पोहोचविणे, अशी महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे.

या नियुक्तीप्रसंगी आमदार दाते सर यांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. पारनेरनगर विधानसभा मतदारसंघातील संघटनात्मक कार्याला बळ देतानाच पक्षाच्या राज्यस्तरीय वाटचालीत योगदान देणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका त्यांच्या उपस्थितीतून अधोरेखित झाली. पक्षातील कार्यकर्त्यांना संधी, नेतृत्वाला प्रोत्साहन आणि संघटनात्मक बांधणीला चालना देण्याच्या दृष्टीने या नियुक्तीकडे महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून पाहिले जात आहे.

यावेळी विधानपरिषदेचे आमदार तथा राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे साहेब, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांतदादा गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतदादा चेडे, संजयशेठ आहेर, संतोषशेठ चौगुले, अविनाशशेठ गोडसे आणि आदित्यशेठ नरड उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांच्या विचारांचा वारसा, जनसेवेची परंपरा आणि सर्वसामान्यांशी असलेली बांधिलकी पुढे नेण्याच्या उद्देशाने संघटनात्मक काम अधिक व्यापक करण्यावर पक्षाचा भर आहे. गोवर्धनशेठ निमसे यांच्या नियुक्तीमुळे वाहतूक सेलच्या कार्याला राज्यभर नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. गोवर्धनशेठ निमसे यांचे राज्यप्रमुखपदी नियुक्तीबद्दल अभिनंदन करून आमदार काशिनाथ दाते सरांसह उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

चौकट : धनंजय निमसे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाहतूक सेलच्या राज्यप्रमुखपदी झालेली नियुक्ती ही पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. पारनेर तालुक्याला प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षीय पातळीवर राज्यस्तरावर काम करण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळाली आहे, ही आपल्या सर्वांसाठी गौरवास्पद गोष्ट आहे. या नियुक्तीमुळे तालुक्यातील कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा मिळेल आणि पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होईल. धनंजय निमसे आपल्या अनुभवातून आणि कार्यक्षमतेतून या जबाबदारीला निश्चितच न्याय देतील, असा मला विश्वास आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा..!
– आमदार काशिनाथ दाते सर
(विधानसभा सदस्य, पारनेर – नगर)

# जगदंबेच्या बालरूपातून जपल्या जाताहेत बालपणीच्या अविस्मरणीय आठवणी

**शेवगावमध्ये देवीच्या वेशभूषेतील चिमुकल्यांच्या फोटोशूटचा नवा ट्रेंड; छायाचित्रकारांनाही मिळाली व्यवसायाची संधी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** बालपणीचे क्षण कितीही सुंदर असले, तरी काळाच्या ओघात अनेक आठवणी धूसर होत जातात. मात्र, एखादे छायाचित्र हाती पडले की तेच क्षण पुन्हा डोळ्यांसमोर उभे राहतात आणि मन आठवणींच्या विश्वात रमून जाते. अशाच बालपणीच्या अविस्मरणीय आठवणींचा ठेवा जपण्याचा एक अनोखा ट्रेंड सध्या शेवगाव शहरात पाहायला मिळत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत लहान मुलांना आई जगदंबेच्या बालरूपात सजवून त्यांचे आकर्षक छायाचित्रण केले जात आहे. श्रद्धा, धार्मिक परंपरा आणि बालपणीच्या गोड आठवणी यांचा सुंदर संगम या माध्यमातून साधला जात आहे.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवीच्या वेशभूषेतील चिमुकल्यांचे फोटोशूट आणि व्हिडिओ बनविण्याचा हा ट्रेंड यंदा विशेष चर्चेत आला आहे. आपल्या लाडक्या पाल्याला आई जगदंबेच्या रूपात पाहताना पालकांच्या चेहऱ्यावर



उमटणारा आनंद काही औरच असतो. देवीच्या रूपातील या चिमुकल्यांचे निरागस भाव, आकर्षक वेशभूषा आणि मोहक रूप पाहून इतरांनाही त्यांचे आकर्षण वाटते. बालपणीच्या या सुंदर क्षणांना छायाचित्रांच्या माध्यमातून कायमस्वरूपी जपण्याची संधी पालकांना मिळत आहे.

वेळ पुढे सरकते, बालपण मागे पडते; मात्र छायाचित्रांच्या माध्यमातून त्या आठवणी पुन्हा जिवंत करता येतात. याच भावनेतून आई जगदंबेच्या बालरूपातील छायाचित्रणाला पालकांकडून पसंती मिळत आहे. श्रद्धेच्या भावनेसोबतच आपल्या मुलांच्या बालपणातील एक अनमोल आठवण जपण्याचा आनंदही यातून मिळत आहे.

या नव्या ट्रेंडमुळे शेवगाव शहरातील छायाचित्रकारांसाठी व्यवसायाची एक नवी संधी निर्माण झाली आहे. देवीच्या वेशभूषेसाठी आवश्यक साहित्य, आकर्षक सेट आणि फोटोशूटची व्यवस्था करून छायाचित्रकार ग्राहकांना ही सुविधा उपलब्ध करून देत आहेत. त्यामुळे बालपणीच्या आठवणी जपण्याची ही कल्पना केवळ भावनिक समाधान देणारी ठरत नसून, स्थानिक छायाचित्रण व्यवसायालाही नवी चालना देत आहे.

**महिनाभरात जवळपास एक लाखांची उलाढाल**

नवरात्रोत्सवाच्या पूर्वीपासूनच देवीच्या वेशभूषेतील लहान मुलांचे फोटोशूट आणि व्हिडिओ बनविण्याचा ट्रेंड यंदा विशेष वाढला. ही संधी ओळखून त्यासाठी आवश्यक आकर्षक सेट आणि वेशभूषा तयार करून ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिली. त्याला मिळालेल्या प्रतिसादातून गेल्या महिनाभरात जवळपास एक लाख रुपयांची उलाढाल झाली आहे.

**मोनिका अमोल भवर,**
किड्स स्टुडिओ, शेवगाव

बालपणीच्या आठवणींना उजाळा द्यायचा असेल, तर छायाचित्र हे त्यासाठी उत्तम माध्यम आहे. काळानुसार अनेक आठवणी धूसर होत जातात; मात्र एखादे छायाचित्र त्या आठवणी पुन्हा जिवंत करते. आई जगदंबेच्या बालरूपातील छायाचित्रणामुळे बालपणीचा हा अविस्मरणीय क्षण कायमस्वरूपी जपता येतो. याच भावनेतून मी माझ्या मुलीचे आई जगदंबेच्या बालरूपात छायाचित्रण केले.

**प्राजक्ता रामेश्वर भापकर,** पालक

# अहिल्यानगर केंद्रावर राज्यस्तरीय करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी संपन्न

**पेमराज सारडा महाविद्यालयाची 'बिन रंगांची गोष्ट' अंतिम फेरीसाठी पात्र**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आयोजित राज्यस्तरीय करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी अहिल्यानगर केंद्रावर उत्साहात संपन्न झाली. अहमदनगर जिल्हा वाचनालय, सावेडी येथील सभागृहात झालेल्या या फेरीत विविध नाट्यसंस्था आणि महाविद्यालयांच्या संघांनी एकांकिकांचे सादरीकरण केले. या स्पर्धेतून पेमराज सारडा महाविद्यालयाच्या 'बिन रंगांची गोष्ट' या एकांकिकेची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर, सागर मेहेत्रे, जालिंदर शिंदे, सुदर्शन कुलकर्णी आणि प्रशांत जठार उपस्थित होते. स्पर्धेचे समन्वयक म्हणून अनंत जोशी यांनी काम पाहिले.

या प्राथमिक फेरीसाठी मंगेश सातपुते आणि इरफान मुजावर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सहभागी संघांनी विविध विषयांवरील एकांकिका सादर करत आपल्या अभिनयकौशल्याचे दर्शन घडविले. या स्पर्धेत नाट्य आराधना संस्थेने 'अंत्यकथा', नाट्य मल्हारने 'अय', न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजने 'पिसाळा', रसाभिनयने 'काही प्रॉब्लेम ये का..?', जनता विद्यालयाने 'मुंबई रिटर्न मंदी', पेमराज सारडा महाविद्यालयाने 'बिन रंगांची गोष्ट', सहज फाउंडेशनने 'प्रेमळ', हाऊस फुल्लने 'नथिंग टू से', तर श्री साई नाट्यकला अकादमी, शिर्डी यांनी 'आत्मा कुडीच भांडण' या एकांकिका सादर केल्या.

या स्पर्धेमुळे स्थानिक नाट्यसंस्था, महाविद्यालयीन कलाकार, लेखक आणि दिग्दर्शकांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले. अशा स्पर्धांमुळे मराठी रंगभूमीची परंपरा समृद्ध होण्यासह नवोदित कलाकारांना प्रोत्साहन मिळते. पेमराज सारडा महाविद्यालयाच्या 'बिन रंगांची गोष्ट' या एकांकिकेची अंतिम फेरीसाठी निवड झाल्याने या संघाला पुढील फेरीत आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.

(पान १ वरून)

## विखे पाटील – थोरातांची सहमती एक्स्प्रेस सुसाट!

निवडणुकीतील सहमती या बाबी बिनविरोध निवडींसाठी महत्त्वाच्या ठरल्या आहेत. संगमनेर: रणजीतसिंह देशमुख, नेवासा: शंकरराव गडाख, राहाता: डॉ. सुजय विखे पाटील, श्रीरामपूर: करण ससाणे, पाथर्डी: आमदार मोनिका राजळे, शेवगाव: राजश्री घुले पाटील, श्रीगोंदा: दत्तात्रय पानसरे, कोपरगाव: विवेक कोल्हे, नगर तालुका: अक्षय कर्डिले, बिगरशेती मतदारसंघ: सचिन जगताप, जामखेड: सचिन घुमरे सहकारी बँकांचे कामकाज शेतकरी, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी थेट जोडलेले असते. त्यामुळे बँकेच्या संचालक मंडळाची रचना ठरवताना स्थानिक नेतृत्वामध्ये समन्वय असणे महत्त्वाचे ठरते. बिनविरोध निवडींमुळे निवडणुकीतील अनावश्यक स्पर्धा कमी होण्यास मदत होते आणि संबंधित प्रतिनिधींना संस्थेच्या कामकाजावर लक्ष केंद्रित करण्याची संधी मिळते. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत ११ जागांवर झालेल्या बिनविरोध निवडी या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. जिल्ह्यातील विविध राजकीय प्रवाह आणि सहकार क्षेत्रातील नेतृत्व एकत्रितपणे निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याची शक्यता या घडामोडींमुळे अधोरेखित झाली आहे. अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत २१ पैकी ११ जागा बिनविरोध झाल्याने सहमतीच्या राजकारणाला महत्त्व मिळाले आहे. विखे–पाटीलथोरात यांच्याशी संबंधित समीकरणे आणि जामखेडमधील विखेशिंदे समन्वयामुळे या निवडणुकीला सकारात्मक राजकीय परिमाण प्राप्त झाले आहे. हकार क्षेत्राच्या विकासासाठी स्थानिक नेतृत्वातील समन्वय, संस्थेच्या कामकाजातील सातत्य आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजांना प्राधान्य देणे महत्त्वाचे ठरणार आहे. उर्वरित जागांवरील निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. मात्र, आतापर्यंत झालेल्या ११ बिनविरोध निवडींनी जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात सहमतीच्या मार्गाला निश्चितच महत्त्व प्राप्त करून दिले आहे.

## शेवग्यात गांजाचे आंतरपीक!

पोलिसांनी घटनास्थळावरून संपूर्ण मुद्देमाल जप्त करून रखमाजी कुशाबा आयनर (वय ८१, रा. वाटापूर, ता. नेवासा) आणि सोपान गुजाबा रूपनर (वय ४६, रा. अंमळनेर, ता. नेवासा) या दोघांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्यावर सोनई पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ (एनपीडीएस) अधिनियम १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्रेमसंबंधातून तरुणाचा खून, दोघांना अटक

एमआयडीसी पोलीस ठाण्यात महेश जाधव व योगेश जाधव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दिनांक १७ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास गणेश याला शिंगवेनाईक (ता. जि. अहिल्यानगर) येथे महेश आणि योगेश यांनी बेदम मारहाण करून जीवे मारले व त्याचा मृतदेह राहुरी कृषी विद्यापीठाजवळील मुळा धरणाच्या बॅक वॉटर कॅनॉलमध्ये फेकून दिला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना, आरोपी महेश जाधव हा जळगाव (ता. राहाता) येथे लपल्याची गोपनीय माहिती सपोनि हेमंत थोरात यांना मिळाली. त्यांनी पथकासह जाऊन महेशला ताब्यात घेतले. त्याचवेळी, दुसरा आरोपी योगेश जाधव हा राहुरी येथील मुळा डॅम परिसरात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि हरीश भोये यांना मिळाल्याने त्यांनी त्याला शिताफीने पकडून एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात दिले. न्यायालयाने दोन्ही आरोपींना २४ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.